
Impact Factor - 6.261
ISSN - 2348-7143
INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION
RESEARCH JOURNEY
INTERNATIONAL E-RESEARCH JOURNAL
PEER REFREED & INDEXED JOURNAL
February - 2019
Special Issue - 115 (B)

# India : Yesterday, Today & Tomorrow

# भारत : काल, आज आणि उद्या



**Guest Editor :**
Dr. A. B. Nikumbh
I/C Principal,
S.S.G.M. Science, Gautam Arts &
Sanjivani Commerce College,
Kopargaon, Tal. Kopargaon, Dist. Ahmednagar

**Executive Editors of the issue :**
Prof. R. S. Zarekar
Prof. G. S. Vidhate
Prof. S. A. Hon
Dr. M. E. Auti

**Chief Editor :**
Dr. Dhanraj Dhangar (Yeola)

This Journal is indexed in :
- UGC Approved Journal
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)
- Indian Citation Index (ICI)
- Dictionary of Research Journal Index (DRJI)

SWATIDHAN PUBLICATIONS

'RESEARCH JOURNEY' *International E- Research Journal*
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF ) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 115 (B)- भारत : काल आज आणि उद्या
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
February-2019

# INDEX


| अ.क्र. | Title of the Paper Name | Author's | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | प्रिया तेंडूलकर : एक स्त्रीवादी चिंतन (इ.स.१९५४ ते इ.स.२००२) | डॉ.गीतांजली बोराडे | 05 |
| 2 | शेतकरी कामगार पक्षातील शंकरराव मोरे व समकालीनांचे योगदान | डॉ.नंदिनी रणखांबे | 11 |
| 3 | महाराष्ट्रातील समाजसुधारणा कार्यात बाळशास्त्री जांभेकर यांचे योगदान | डॉ.के.एल.गिरमकर | 14 |
| 4 | भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील स्त्रियांचे योगदान(विशेष संदर्भ गांधी युग) | डॉ.अजितकुमार जाधव | 18 |
| 5 | स्त्री चळवळीतील स्थित्यंतरे | प्रा.भाऊसाहेब सांगळे | 23 |
| 6 | पेशवेकालीन भुते व सरकारची भुमिका | डॉ.शिवाजी वाघमोडे | 26 |
| 7 | यशवंतराव चव्हाण : नवमहाराष्ट्राचे शिल्पकार | प्रा.जयपाल सावंत | 32 |
| 8 | २१ व्या शतकातील भारतापुढील आव्हाने | प्रा.संध्या पेंडकर-देशपांडे | 38 |
| 9 | महाराष्ट्रातील शेतकरी आंदोलने आणि राजकारण | डॉ.सुमित यादव | 42 |
| 10 | भारतीय स्त्रीचे बदलते सामाजिक जीवन | डॉ.मंगला निकुंभ | 49 |
| 11 | शेतकरी चळवळीतून उदयास आलेले नेतृत्व आणि महाराष्ट्राचे राजकारण | डॉ.दत्तात्रय सावंत | 52 |
| 12 | भारतीय संस्थाने व त्यावरील ब्रिटीश प्रभाव | डॉ.वासुदेव डोंगरदिवे | 57 |
| 13 | रायगड जिल्ह्यातील मांदाड – कुडे लेणीचा | डॉ.भानुदास शिंदे | 61 |
| 14 | स्त्रीवादी चळवळीतील महात्मा फुले यांच्या विचारांची प्रेरणा – एक अभ्यास | प्रा.एम.एस.निकम | 66 |
| 15 | जागतिकीकरणानंतर भारतीय अर्थव्यवस्थेपुढील आव्हाने | डॉ.सुरेखा भिंगारदिवे | 71 |
| 16 | स्त्रीवादी चळवळी आणि केंद्र व महाराष्ट्र शासनाची भूमिका | डॉ.किशोर गटकळ | 74 |
| 17 | कोयना जळविद्युत प्रकल्प : जलाशय विंधन प्रक्रिया | डॉ.विश्वनाथ पवार | 79 |
| 18 | प्रादेशिक प्रश्नांचे वाढते आणि भारताची बदलती राजकीय संस्कृती | प्रा.सौ.व्ही.पी.सुपेकर | 83 |
| 19 | कॉम्रेड एम.व्ही.देशपांडे व  कॉम्रेड एस.एस. मिरजकर यांचे अहमदनगर जिल्ह्यातील कम्युनिस्ट पक्षातील योगदान | प्रा. गणेश विघाटे | 86 |
| 20 | सामाज प्रबोधानातील प्रसार माध्यमांची भूमिका | डॉ.सुनिल परदेशी | 91 |
| 21 | भारतीय लोकशाही : यश आणि अपयश | डॉ.संभाजी तनपुरे | 93 |
| 22 | सामाजिक सुधारणातील स्त्री सुधारकांचे योगदान | प्रा.रमेश झरेकर | 102 |
| 23 | महाराष्ट्रातील प्रमुख विचारवंतांचे शैक्षणिक योगदान | प्रा.श्रीमती वंदना देशमुख | 105 |
| 24 | पंडित नेहरूंचे अलिप्ततावादी धोरण | प्रा.डी.पी.बागुल | 108 |
| 25 | कम्युनिस्ट  चळवळीतील स्त्रियांची भूमिका | शितल धरम व डॉ.फसले मच्छिंद्र कारभारी | 110 |
| 26 | भारतीय लोकशाहीचे यश अपयश | प्रा.शिवाजी गायकवाड | 113 |
| 27 | आर्थिक विकासात शेतीचे योगदान : काल, आज, उद्या | प्रा.दिनेश आर. घुगे | 115 |
| 28 | भारतातील प्रादेशिक राजकीय पक्ष आणि राजकारण | प्रा.श्री.चंद्रकांत हारदे | 118 |
| 29 | भारताच्या विकासात प्रसारमाध्यमांचे योगदान | प्रा.कटके सतीश मैलारी | 123 |
| 30 | भारतीय ग्रामपंचायतीची कार्यपद्धती | सुवर्णा कडलक व डॉ.आर.डी.मोसले | 126 |
| 31 | प्रादेशिक पक्ष आणि भारतीय राजकारण | प्रा.राजू सानप | 132 |
| 32 | भारतीय राजकारणात प्रादेशिक पक्षांचा प्रभाव | प्रा. ए. पी. बनारसे | 137 |

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)-0.676 (2013)
Special Issue 115 (B)- भारत : काल आज आणि उद्या
UGC Approved Journal
ISSN : 2348-714
February

# यशवंतराव चव्हाण : नवमहाराष्ट्राचे शिल्पकार

प्रा.सावंत जयपाल चंद्रकांत
सहाय्यक प्राध्यापक
इतिहास विभाग
शंकरराव जगताप आर्टस् अ‍ॅण्ड कॉमर्स् कॉलेज,
वाघोली, ता.कोरेगांव जि.सातारा

कोणताही मानव काही श्रध्दा व तत्वज्ञान यांनी प्रेरीत झालेला असतो आणि चांगल्या विचारांखे चांगले घडू शकत नाही अशा सुधारणावादी विचारांनी प्रेरीत झालेले व्यक्तिमत्व म्हणजे 'यशवंतराव चव्हाण' होय.स्वातंत्र्यप्राप्तीनंतर महाराष्ट्राच्याच नव्हे तर देशाच्या राजकिय धोरणांवर ज्या महनिय व्यक्तींचा प्र पडलेला दिसतो त्यामध्ये मा.यशवंतराव चव्हाण यांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. सुधारणावादी विचार अ त्याच प्रकारचे तत्वज्ञान यांची प्रेरणा घेऊन यशवंतरावांनी महाराष्ट्राचे नेतृत्व केले. बहुजन समाजाच्या चौ विकासाचा विचार करून यशवंतरावांनी समाजवादी समाजरचना निर्माण करण्याचा प्रयत्न केल्याचे दि नेतत्वाच्या संकल्पनेत सामान्य विशिष्ठ स्थान प्रतिष्ठा किंवा गुणवत्ता पुढारी व अनुयायी संबंधात व स कार्यांचे तत्व यांचा समावेश होतो. नेतृत्वाबाबत बोलताना आर.एम.स्टॉगडिल हे लेखक म्हणतात कि, "ने म्हणजे निष्क्रीय स्थान किंवा विशिष्ट गुणवत्ता असलेले व्यक्तिमत्व नाही. एखाद्या समुहाच्या कार्यातील स सहभाग व स्वातंत्र्याच्या नेतृत्वाने ते कार्य यशस्वी करण्याची क्षमता यामुळे नेत्याचे विशिष्ट स्थान निर्माण ह"[१]हे स्थान यशवंतरावांनी आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासात निर्माण केले व महाराष्ट्राच्या राजकीय, शैक्षणि सामाजिक, साहित्यीक, आर्थिक, सांस्कृतीक, जडणघडणीत मोलाचे योगदान दिलेले दिसते.'यशवंतराव च ही एक व्यक्ती नसून तो एक विचार आहे' असे जेव्हा म्हटले जाते तेव्हा ती केवळ अलंकारीक भाषा नसते महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक व आर्थिक परिवर्तनाच्या विचारधारेला विकसित करण्याचे कार्य ती आप समोर उभी करते. सत्तास्थानी राहून या विचारांना व्यावहारीक पाया मिळवून देण्याचे अत्यंत महत्वपूर्ण क त्यांनी केलेले दिसते.

RESEARCHJOURNEY

## पुर्वचरीत्र :

१२ मार्च १९१३ रोजी बळवंतराव आणि विठाबाई या दाम्पत्याच्या पोटी तत्कालिन सातारा जिल्ह्या देवराष्ट्रे या गावी झाला.[२] सन १९१७ साली प्लेगच्या साथीमध्ये त्यांच्या वडिलांचे निधन झाले. त्यावे यशवंतरावांचे वय अवघे ४ वर्षांचे होते.[३] त्यानंतर आईसोबत त्यांनी आपल्या बालपणीचे थोडे दिवस दे येथे घालवले. पितृछत्र बालपणीच हरवल्यामुळे यशवंतरावांना घडवण्याची जबाबदारी त्यांची माता विठा यांनी बखुबी वठवली.त्यांच्या प्राथमिक शिक्षणाचा आरंभ तेथेच झाल्याचे दिसते.पुढील प्राथमिक व माध्य शिक्षण त्यांनी कराडला घेतले. सन १९३८ मध्ये त्यांनी इतिहास व राज्यशास्त्र या विषयांतून मुंबई विद्यापीठा बी.ए.पदवी मिळवली. पुढे सन १९४१ मध्ये पुण्याच्या लॉ कॉलेजमधून एल.एल.बी.प्राप्त केली. शिक्षण होताच यशवंरावांचे लग्न फलटण येथील रघुनाथराव मोरे यांची कन्या वेणूताई यांच्याशी करून देण्यात आले

## राजकारण :

यशवंतरावांचे शिक्षण चालू असतानाच महात्मा गांधीजींच्या स्वातंत्र्यआंदोलनाने ते प्रभावित झाले होते. सन १९३० साली म.गांधीजींनी कायदेभंगाचा लढा उभारला. या आंदोलनावेळी यशवंतरावांनी नि

फडकवल्याबद्दल अठरा महिन्यांची सक्त मजूरीची शिक्षा त्यांना झालेली होती. सन १९४० साली यशवंतरावांची सातारा जिल्हा कॉंग्रेसच्या अध्यपदी निवड करण्यात आली. पुढे १९४२ साली देशभरात चलेजाव आंदोलनाचे वारे वाहू लागले. या कालखंडात त्यांनी भूमीगत पध्दतीने कार्य करण्यास प्रारंभ केला परंतू दुंदैवान ते पकडले गेले आणि त्यांना दोन वर्षाचा कारावास भोगावा लागला.यामुळे यशवंतराव डगमगले नाहीत तर त्यांच्या राजकीय कर्तृत्वाला आणखीन धार प्राप्त झाली. १९४६ साली झालेल्या कायदेमडळांच्या निवडणूकीत यशवंतराव दक्षिण सातारा या मतदार संघातून निवडून गेले.यावेळी त्यांना गृहखात्याचे पार्लेमेंटरी सेक्रेटरी म्हणून नेमण्यात आले. सन १९५२ मध्ये कराड मतदारसंघातून विधानसभेवर निवड होऊन ते नागरी पुरवठा मंत्री झाले. [४]सन १९५६ मध्ये व्दिभाषिक मुंबई राज्याची स्थापना होऊन व्दिभाषिक राज्याचे मुख्यमंत्री म्हणून त्यांची निवड झाली.[५] १९५६ ते १९६० हा कालखंड संयुक्त महाराष्ट्र चळवळीचा होता. गुजराथी पुढारी मुंबई गुजरात राज्याला मिळावी यासाठी प्रयत्नशिल होते. या बिकट प्रसंगी यशवंतरावांच्या नेतृत्वाची कसोटी लागली. यशवंतराव चव्हाण नेहमी पं.नेहरूंना झुकते मप देत असत. त्यांच्या या वागण्यामुळे काही काळ संयुक्त महाराष्ट्र चळवळवादी आणि यशवंतराव चव्हाण यांच्यात तणाव निर्माण झालेला दिसतो. त्यांची भूमीका स्पष्ट होती की, आधी केंद्रिय नेतृत्व मुंबईसह महाराष्ट्र या कल्पनेला राजी होऊ द्यावे. यशवंतरावांनी फलटण येथील १ डिसेंबर १९५५ च्या सभेतील भाषणात, संयुक्त महाराष्ट्रापेक्षा पं.नेहरू अधीक मोठे आहेत. त्यांच्या नेतृत्वाचा आदर करणे हे मी अधिक महत्वाचे समजतो.असे म्हटले होते.[६] त्यांच्या या भूमिकेमुळे यशवंतराव महाराष्ट्रात अप्रिय ठरलेले होते.महाराष्ट्रात असे वातावरण असतानाच १६५६ साली यशवंतराव चव्हाण मुख्यमंत्री झाले.

संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीच्या भूमीकेत यशवंतरावांचा दुरदर्शीपणा होता.महाराष्ट्रापेक्षा देश महत्वाचा आहे. मुख्य राष्ट्रीय प्रवाहापासून आपण वेगळे राहीलो तर आपल्या राज्याची प्रगती खुंटेल अशी भिती यशवंतरावांना होती.पं.नेहरूंशी एकनिष्ठ राहून महाराष्ट्राचा प्रश्न त्यांनी सोडवला.व्दिभाषिक मुंबई राज्याचे विभाजन होऊन १ मे १९६० रोजी स्वतंत्र महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. यशवंतरावांनी महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीपासूनच महाराष्ट्र एकसंध कसा राहील याकडे राजकारण विरहीत प्रेमळ नजरेने पाहीले. सुरूवातीपासूनच वेगळया विदर्भाची जी मागणी पुढे येत होती ती महाराष्ट्राला अहितकारक आहे हे ओळखून यशवंतरावांनी पं. नेहरूंव्दारे कन्नमवारांना उपमुख्यमंत्रीपद दिले व वेगळया विदर्भाची मागणी सोडायला लावली.[७]

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री या नात्याने यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्रात केवळ प्रशासनावर भर न देता काही अत्यंत महत्वाचे निर्णय घेतले. विकेंद्रिकरणाला महत्व, पंचायत राज, कसेल त्याची जमीन, सहकारी तत्वांवर १८ साखर कारखान्यांची उभारणी, पाटबंधारे व उद्योग विकासासाठी मंडळ, बहुजन समाजातील विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण आणि मराठी भाषेला राज्य भाषेचा दर्जा मिळवून दिला.[८]१९६२ साली चीनने भारतावर एकतर्फी आक्रमण केले यावेळी पं.नेहरूंनी यशवंतरावांना दिल्लीच्या राजकारणात बोलावले आणि त्यांना भारताचे संरक्षणमंत्रीपदी नियुक्त केले. १९६२ ते १९६६ या त्यांच्या संरक्षणमंत्रीपदाच्या कार्यकाळात त्यांनी अनेक महत्वपुर्ण निर्णय घेतलेले आहेत. भारतीय हवाई दल मजबूत असावे याकरीता त्यांनी 'मिग२१' ही लढाऊ विमान तयार करणाया सार्वजनिक क्षेत्रातील स्वतंत्र कंपनीची स्थापना करून विमान उत्पादनास प्रारंभ केला.[९] १९६५ चे भारत पाकिस्तान युध्द यशवंतरावांच्या कसोटीचा क्षण ठरला. या युध्दानेच यशवंरावांचे मुत्सध्दी युध्दनेतृत्व सर्वमान्य झाले.देशाचे सर्व सैन्य व जनता यशवंतराव चव्हाण यांच्याकडे एक समर्थ राजकीय नेता म्हणून पाहू लागली.[१०] भारताच्या संरक्षण मंत्रीपदानंतर यशवंतरावांनी भारताचे गृहमंत्रीपद देखील सांभाळले. १९७० साली त्यांच्यावर केंद्रिय अर्थखात्याची जबाबदारी देण्यात आली.या ठिकाणी देखील

ISSN : 2348-7143
February

यशवंतराव यशस्वीच ठरले. १९७४ साली त्याच्या खात्यात बदल करूनत्यांना परराष्ट्रमंत्रीपद देण्यात आले. यशवंतराव चव्हाण जसे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून ओळखले जातात तसेच ते भारतीय परराष्ट्र व्यवहाराचे शिल्पकार म्हणूनही ओळखले जातात. एक मुरब्बी, निर्णकुशल प्रशासक, अभ्यासू चतुरस्त्र वक्तृत्व शैली असणारा विव्दान राजकारणी अशीही त्यांची ओळख आहे.

**शिक्षण व साहित्य :**

शिक्षणसमाज परिवर्तनाचे एक प्रभावी माध्यम आहे. त्याचा उपयोग समाजहितासाठी करणे गरजेचे ठरते. भारत हा खेडयांचा देश असल्याने भारताचा समुळ विकास करण्यासाठी शिक्षणाची ज्योत ग्रामीण भागात घरोघरी पेटवली जावी हा यशवंरावांचा ध्यास होता.यशवंतराव चव्हाण आपले शैक्षणिक विचार स्पष्ट करताना म्हणतात की, "शिक्षण ही सामाजिक गरज असली तरी ते आर्थिक विकासाचे एक मुलभूत साधन आहे. व्यक्तीला शिक्षणाची जोड दिल्याशिवाय समाजात नवीन सामर्थ्य निर्माण होणार नाही."[११]यशवंतराव चव्हाण आपली शिक्षणाची व्याख्या स्पष्ट करताना म्हणतात कि, " शिक्षित व्यक्तीला स्वत:भोवती घडणाया इतर गोष्टी आणि जगामध्ये घडणाया इतर गोष्टी यांची ज्यामुळे संगती लावता येते, त्यांचा योग्य अर्थ समजावून घेता येते आणि त्याचा परिणाम आपल्या जीवनावर व व्यक्तीमत्वावर काय घडतो हे समजावून घेता येते आणि समजावून देता येते, त्याला शिक्षण म्हणतात."[१२]यशवंतरावांना इतिहास, मराठी व गणित विषयांची फार आवड होती. इतिहास म्हणजे केवळ पुनरावृत्ती असा ठोकळ हिशोब ते करत नसत. इतिहास काल घडला, आज घडत आहे आणि उद्या घडणार आहे अशी त्यांची इतिहासाची उत्क्रांतीवादी श्रध्दा होती.[१३]या शैक्षणिक विचारातूनच त्यांनी शिक्षण विकासाच्या अनेक योजना कार्यान्वीत केल्या.

महाराष्ट्रामध्ये राजकीय, सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक विकासासाठी सर्वत्र प्राथमिक शिक्षणाचा प्रचार प्रसार होणे गरजेचे आहे असे त्यांचे मत होते. शिक्षणासंदर्भात व्यक्त केलेले मत या संदर्भात अतिशय महत्वपुर्ण आहे. ते म्हणतात, "समाजभिमुख शिक्षणाची संकल्पना मांडताना, शिक्षणातून केवळ ज्ञानाची उपासना वा बुध्दीची जोपासनाच करून चालणार नाही, तर भावनांची प्रगल्भता आणि अंत:करणाचा मोठेपणा अंगी असणे आवश्यक आहे. मानवाचे मन शिक्षणाच्या संस्काराने अधिक संपन्न केल्याशिवाय समाज खया अर्थाने समाज बनत नाही."[१४]शिक्षण घेतल्याने मानव स्वावलंबी होऊ शकतो आणि आपली प्रगती करून घेऊ शकतो. यामुळे शिक्षण घेण्याचा आणि सर्वापर्यंत शिक्षण पोहचवण्या संकल्प घेतला तर आपण निश्चितपणे प्रगती करू शकतो. यामुळेच यशवंतराव म्हणतात की, "शिक्षण व राष्ट्रीय दृष्टीकोणाचा अभाव यामुळे आपल्याला जीवनाच्या सर्व क्षेत्रात माघार घ्यावी लागते. याऊलट शास्त्रीय वैज्ञानिक ज्ञानाने युक्त अशी राष्ट्रे स्वत:चे सार्वभौमत्व अखंड ठेवू शकतात. इतकेच नव्हे तर दुसयाच्या मदतीला धावूनही जाऊ शकतात.यामुळे शिक्षणरूपी ज्ञानाचा झरा वाहता ठेवणे गरजेचे ठरते. असत्यातून सत्याकडे, अंधारातून प्रकाशाकडे, मृत्यूपासून अमृत्युकडे मला ने या अमृताच्या प्राप्तीसाठी देवांनी समुद्रमंथन केले. पण त्या समुद्रमंथनातून अमृत शिल्लकच राहिलेले नाही. म्हणून आता ज्ञान हेच अमृत आहे. या अमृताने तुम्हाला समर्थ बनायचे आहे. समाजजीवन समर्थ बनवायचे आहे."[१५] यशवंतराव चव्हाण महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदावर असताना त्यांनी शैक्षणिक बाबतीत अनेक महत्वपूर्ण निर्णय घेतल्याचे दिसते.सन १९५८ साली मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद येथे स्थापन झाले. आर्थिकदृष्टया कमकुवत असणाया विद्यार्थ्यांना इ.बी.सी. सवलत सुरू केली. सन १९६२ साली कोल्हापूरला शिवाजी विद्यापीठाची स्थापना, राहुरी येथे कृषी विद्यापीठाची स्थापना, आदिवासींच्या मुलांसाठी आश्रमशाळांची स्थापना. सातायात सैनिक स्कुलची स्थापना, कराड व औरंगाबादेस अभियांत्रिकी महाविद्यालयांची सुरूवात, सर्वात महत्वपुर्ण बाब म्हणजे ते

तहहयात रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष होते आणि जेव्हा ते या संस्थेचे अध्यक्ष झाले तेव्हा ते उदगारले होते की, " मी मुख्यमंत्री झालो त्यापेक्षा अधिक आनंद मला मी रयत शिक्षण संस्थेचा अध्यक्ष झालो त्यावेळी झाला."[१६] नवोदित लेखक व कवींना प्रेरणा मिळावी व त्यांचे ग्रंथ प्रकाशित व्हावेत या हेतूने त्यांनी महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाची स्थापना केली.ते स्वत: एक उत्तम लेखक होते. १९७५ साली कराडला झालेल्या साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष आणि १९८४ सालच्या विदर्भ साहित्य संमेलनाचे उदघाटक असे साहित्यीक सन्मानही त्यांना मिळालेले होते. 'कृष्णाकाठ ही कृती त्यांच्यातील साहित्यीकाचे दर्शन घडवते. १ मे १९६० रोजी शपथविधी समारंभात महाराष्ट्राचा राज्यकारभार इंग्रजी ऐवजी मराठीत चालवण्याचे त्यांनी आश्वासन दिले व यासाठी त्यांनी डायरेक्टोरेट ऑफ लॅंगवेजेस हे खाते सुरू केले.[१७]

अर्थकारण :

आर्थिक सुब्बता हा कोणत्याही राष्ट्राचा 'कणा' असतो. महाराष्ट्र असो वा भारत देश यांच्या आर्थिक मजबुतीसाठी यशवंतरावांनी काही मुलगामी स्वरूपाचे विचार मांडलेले आहेत. त्यांच्या मते "वैयक्तिक जीवनात जशी आपण प्रगती करतो तशीच ती सार्वजनिक जीवनात करावयाची असते. राज्य कारभारामध्ये सुधारणा व प्रगती करण्याचे ठरवून तुम्ही आणि मी जर काम करणार असलो तरी आत्मसंशोधनाची आत्मटीकेची आपल्याला फार जरूरी आहे.[१८] यशवंतरावांच्या मनातील देशाच्या आर्थिक विकासाची तळमळ, त्यांची आर्थिक विश्लेषणाबाबतची बुध्दी आणि कसब या गोष्टी लक्षात घेऊन इंदीरा गांधींनी आपल्या मंत्रिमंडळात १९७०७१ साली अर्थमंत्री पदावर त्यांना नेमले. तेव्हांपासून सन १९७५ पर्यंत पाच वर्ष त्यांनी देशाचे अर्थमंत्रीपद सांभाळले. त्यांच्या मते देशाची आर्थिक वा राजकीय परिस्थिती कशा प्रकारची आहे यापेक्षा त्यांचे नियोजन कशा प्रकारचे आहे यावर त्यांची प्रगती अवलंबून असते.नियोजनाचे महत्व मांडताना यशवंतराव सांगतात आपले कुटूंब, गाव, समाज आणि राष्ट्र यांच्या प्रगतीची ईमारत उभारण्याकरीता समाजवाद, लोकशाही आणि नियोजन अत्यंत महत्वाचे आहे."एखाद्या देशाची आर्थिक, सामाजीक किंवा राजकीय पध्दती कोणती का असेना आर्थिक विकसनशिल किंवा आर्थिक विकसातील नियोजनाचे महत्व त्या देशाला कळालेले नसेल तर त्याला आर्थिक क्षेत्रात प्रगती करणे फार अवघड होऊन जाईल."[१९] असे यशवंतराव चव्हाणांचे स्पष्ट मत होते.

अर्थमंत्री पदावर कार्यरत असताना त्यांनी देशातील काळया पैशावर नियंत्रण ठेवण्याची निकड त्यांनी वारंवार प्रतिपादीत केलेली दिसते.ते म्हणतात " या काळया पैशाच्या निर्मितीची साधने बरीच असतात. करचुकवेगिरी हे त्यातले एक प्रमुख साधन होय. याव्दारा प्राप्तीकर चुकवला जातो. या मिळकतीचा अंदाज सन १९६८६९ मध्ये १४०० कोटी रू.इतका वांछू समितीने केल्याचा दाखला यशवंतराव देतात. या काळया पैशाच्या नियंत्रणाची नितांत गरज असल्याचे प्रतिपादन त्यांनी वारंवार केले होते."[२०]महाराष्ट्राच्या समतोल विकासासाठी त्यांनी प्रयत्न केल्याचे दिसते. महाराष्ट्रातील ग्रामीण भागात शेतीमालावर प्रक्रिया करण्याचे उद्योग उभारावेत असे त्यांचे मत होते. ग्रामीण भागात उद्योगांची उभारणी करण्यासाठी येथे औद्योगिक वसाहती स्थापन कराव्या आणि त्यात वीज, पाणी, रस्ते आदींची सोय करावी हा त्यांचा विचार एम.आय.डी.सी.च्या रूपाने सत्य झाला. या अनुशंगानेच १ ऑगस्ट १९६२ रोजी महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाची स्थापना ठाण्यातील वागळे इस्टेटमध्ये तात्कालिन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या उपस्थितीत समारंभपूर्व करण्यात आली.[२१] उद्योगांच्या सोबतच कृषी विकासाकडेही त्यांनी तितकेच लक्ष दिले होते. भुमिहीनांचा प्रश्न असो किंवा शेतीच्या आधुनिकीकरणाचा यशवंतराव नेहमीच ते सोडवण्यात आघाडीवर असल्याचे दिसते.शेती उत्पादन वाढवण्यासाठी सहकारी तत्वावर शेती पध्दतीचा पुरस्कार करावा या मताचे ते होते. सहकारी चळवळीबाबत आपले मत

मांडताना म्हणतात, "सहकारी चळवळ ही काही एखाद्या पक्षाची चळवळ नव्हे. तात्वीकदृष्टया सहकारी चळ ही मुख्यत: लोकशाहीची चळवळ आहे हे आपण विसरता कामा नये. सामान्य आणि शोषीत समाज उपायोगी पडणे हा तर या चळवळीचा प्राणच आहे. पण खया अर्थाने आपल्याला ही चळवळ चालवा असेल तर तिच्याकडे आपण लोकशाहीच्या दृष्टीकोणातून पाहीले पाहीजे. लोकाशाही हे जे तिचे स्वरूप आ आपण सुरक्षित ठेवले पाहीजे, जोपासले पाहीजे."[२२] शेतीसंबंधी त्यांची विचारसरणी आधुनिक स्वरूपाची कसेल त्याची जमीन हा कायदा त्यांनी अमलात आणला. कोयना आणि उजनी प्रकल्पांच्या उभारणीला दिली. यशवंतरावांनी महार वतने नष्ट केल वि दलितांच्या इनामी जमिनी त्यांच्या मालकीच्या केल्या व गावाच्या कामाच्या शेकडो पिढयांच्या वेठबिगारीतून मुक्त केले.[२३] थोडक्यात यशवंतरावांचे जे योगदान महा राज्याच्या राजकीय क्षेत्रात दिसते तेच योगदान महाराष्ट्र राज्याच्या शैक्षणिक, सामाजिक व साहित्यीक क्षे नक्कीच आहे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

समारोप :

यशवंतराव चव्हाण यांनी केलेल्या कार्याची दखल अवघ्या महाराष्ट्रानेच घेतलेली नाही तर अवघा भारतवर्ष त्यांचे गोडवे गातो. त्यांच्या कार्याची पोहोच म्हणून त्यांना जे मानसन्मान मिळालेले आहेत ते पुढीलप्रमाणे सांगता येतील.डिसेंबर १९५९ मध्ये अलिगड मुस्लिम विद्यापीठाची ऑनररी डीग्री ऑफ एल.एल. डी. मिळालेली होती. त्याचप्रमाणे कानपूर विश्वविद्यालय, मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर या विद्यापीठांनी डॉक्टर ऑफ लॉ, मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी यांनी १९७६ साली डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी तर मार्च १९८४ मध्ये पुणे विद्यापीठाने डि.लिट. ही पदवी देऊन सन्मानित केले. ३१ मे १९८६ रोजी क्षेत्र माहूली येथिल रामशास्त्री प्रभूणे प्रतिष्ठानाने मरणोत्तर सामाजिक न्याय पुरस्कार देऊन त्यांना सन्मानित केले होते.

अशा एका तेजस्वी राष्ट्रीय नेतृत्वाचा अस्त दिनांक २५ नोहेंबर १९८४ रोजी झाला आणि अवघा महाराष्ट्र एका असामान्य राजकीय कतृत्वाला आणि प्रतिभावंताला मुकला.

संदर्भ ग्रंथ सुची

१. डॉ.दिवान चंद्रशेखर, राजकिय सिध्दांत आणि राजकिय विश्लेषण, विद्या प्रकाशन, नागपूर, पृ.६७
२. चव्हाण यशवंतराव, कृष्णाकाठ, प्रेस्टीज प्रकाशन,प्रथमावृत्ती, पुणे, १९८७, पृ.१३
३. कित्ता.
४. दै.तरूण भारत, १२ मार्च २०१२, स्व.यशवंतराव चव्हाण, जन्मशताब्दी विशेषांक, लेख राम जोशी, यशवंतराव आदर्श नेतृत्वाचा वस्तूपाठ, पृ.०४
५. डॉ.दिक्षित दुर्गा (संपा.), डायमंड महाराष्ट्र संस्कृतीकोष, डायमंड प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, २००९, ५०
६. वाघ रामनाथ (संपा.), युगप्रवर्तक यशवंतराव चव्हाण, यशवंतराव चव्हाण व्यासपीठ, अहमदनगर, व्दितिय आवृत्ती, पृ.१७
७. नलावडे प्रमोद, मासिक लोकराज्य, माहीती व जनसंपर्क महासंचनालय, मुंबई, मार्च २०१२, पृ.१४
८. डॉ.मेहंदळे विश्वास, यशवंतराव ते विलासराव, अनुबंध प्रकाशन, पुणे, २००७, पृ.८०
९. सारडा शंकर, यशवंतराव कर्तृत्व आणि नेतृत्व, दिलिपराज प्रकाशन, पुणे, २००३, पृ.१४७

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)-0.676 (2013)
Special Issue 115 (B)- भारत : काल आज आणि उद्या
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
February-2019

१०.जोशी रामभाऊ, यशवंतरावांचे अंतरंग विरंगुळा, यशोदा प्रकाशन, पुणे, २००८, पृ.१२९
११.नलावडे प्रमोद, मासिक लोकराज्य, उपरोक्त, पृ.७३
१२.चव्हाण यशवंतराव,सहयाद्रिचे वारे, मुंबई, १९६२, पृ.१४०
१३.काळे बाबूराव, यशवंतराव चव्हाण, गो.य.राणे प्रकाशन पुणे, व्दितियावृत्ती, १९६५ पृ.१७
१४.चव्हाण यशवंतराव, भूमिका, प्रेस्टीज प्रकाशन,प्रथमावृत्ती, पुणे, १९७९, पृ.१६८
१५.भोळे भा.ल.यशवंतराव चव्हाण राजकारण आणि साहित्य, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, १९८५ पृ. १४२
१६.थोरात संभाजीबाबा, यशवंतराव चव्हाण झुंझार नेतृत्वाचा शोध आणि बोध, आगाशिव प्रकाशन, कराड, १९८८,पृ.१०५
१७.पाटील रा.तु. यशवंतराव चव्हाण : एक कर्तबगार पण वादग्रस्त मुसद्दी, जनवाणी प्रकाशन, पुणे,१९८७, पृ.३३
१८.चव्हाण यशवंतराव, सहयाद्रीचे वारे, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, तिसरी आवृत्ती, मुंबई, १९९२, पृ. १९९
१९.कित्ता पृ.६५
२०.Chavan Y.B., Pradhan R.D.(Ed.) Selected Speeches in Parliament 3 Volumes, P.59
२१.डॉ.गगराणी भूषण, स्मरणिका, उद्योगस्मृती, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ सुवर्ण महोत्सव स्मरणिका, मुंबई,२०१२, पृ.३
२२.चव्हाण यशवंतराव, युगांतर, कॉन्टीनेंटल प्रकाशन, पुणे, १९९९, पृ.१४०, १४१
२३.डॉ.दुकळे प्रकाश, यशवंतराव चव्हाण : माणूस आणि लेखक, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, २०१२, पृ.४२

RESEARCHJOURNEY